# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date: 06 April 2025
## Time: 7.10 to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: ०६ एप्रिल २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज तामिळनाडूत रामेश्वरम् इथल्या नवीन पंबन रेल्वे पुलाचं लोकार्पण
- पुढील वर्षापर्यंत नक्षलवाद संपवण्याचा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा संकल्प
- धर्मदाय रुग्णालय व्यवस्थापनावर ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे नियंत्रण ठेवण्याचा सरकारचा निर्णय
- लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांचा डोक्यात गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न
  आणि
- श्रीराम नवमी निमित्त आज ठिकठिकाणच्या राम मंदिरांमध्ये राम जन्मोत्सवासह विविध कार्यक्रमांचं आयोजन

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज रामनवमीच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडूत रामेश्वरम इथं भेट देणार आहेत. रामेश्वरम् शहराला मुख्य भूमीशी जोडणाऱ्या नवीन पंबन रेल्वे पुलाचं लोकार्पण त्यांच्या हस्ते होणार आहे. आकाशवाणीवरून या कार्यक्रमाचं थेट प्रसारण केलं जाणार आहे.

समुद्रावर बांधलेला हा भारतातला पहिला व्हर्टीकल लिफ्ट म्हणजेच उभा वर उचलला जाणारा सागरी सेतू आहे. अभियांत्रिकीमधला आणखी एक चमत्कार मानला जाणारा ५५० कोटी रुपये खर्चुन बांधलेला हा सेतू, सुमारे दोन किलोमीटर लांबीचा असल्याची माहिती, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. रामेश्वरम ते

तांबरम दरम्यानच्या रेल्वे सेवेलाही पंतप्रधान हिरवा झेंडा दाखवणार आहे. या कार्यक्रमानंतर पंतप्रधान रामेश्वरमच्या रामनाथ स्वामी मंदिरात श्रीरामांचं दर्शन आणि पूजा करतील त्यानंतर एका कार्यक्रमालाही ते संबोधित करतील. एकूण आठ हजार तीनशे कोटी रुपयांच्या प्रकल्पाचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन आणि पायाभरणी होणार आहे.

****

पुढच्या वर्षीच्या मार्चपर्यंत नक्षलवाद संपवण्याचा संकल्प सरकारनं केला असल्याचं, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. काल छत्तीसगडमध्ये बस्तर जिल्ह्यात दंतेवाडा इथं बस्तर उत्सवाच्या समारोप समारंभात ते बोलत होते. नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात येण्याचं आवाहन शहा यांनी केलं. छत्तीसगडच्या आदिवासी कला आणि हस्तकला यांना प्रोत्साहन दिल्याबद्दल त्यांनी बस्तर पांडुमचं कौतुक केलं.

****

धर्मदाय रुग्णालयांचं संपूर्ण व्यवस्थापन ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर आणणार असून, त्यावर सरकारचं नियंत्रण असेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. दीनानाथ रुग्णालय प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर ते काल पुण्यात वार्ताहरांशी बोलत होते. लवकरच ही यंत्रणा कार्यान्वित होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं, ते म्हणाले...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दरम्यान, दीनानाथ रुग्णालय प्रकरणातल्या मयत तनिषा भिसे यांच्या कुटुंबियांची काल मुख्यमंत्र्यांनी भेट घेतली, यावेळी त्यांनी भिसे कुटुंबियांचं सांत्वन करून, या प्रकरणाची सखोल चौकशी तसंच कठोर कारवाई करण्याचा विश्वास दिला. आमदार अमित गोरखे यावेळी उपस्थित होते.

****

मुख्यमंत्री फडणवीस यांनी काल पुण्यात महसूल विभागाच्या कार्यशाळेत महसूल विभागाच्या संकेतस्थळांचं तसंच विविध ऑनलाईन सेवांचं लोकार्पण केलं. महसूल विभागाशी संबंधित गेल्या पाच वर्षांत निर्गमित झालेले शासन निर्णय, परिपत्रकं, अधिसूचना यांचं एकत्रित संकलन केलेली पुस्तिका तसंच 'महसूल अधिकारी नियमपुस्तिकेचं प्रकाशनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं.

****

विरोधकांनी कितीही खोडा घातला तरी लाडकी बहीण योजना बंद करणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. कोल्हापूर जिल्ह्यात राधानगरी तालुक्यातल्या सरवडे इथं पक्षाच्या आभार यात्रा सभेत ते काल बोलत होते. स्थानिक स्वराज्य संस्था हा सत्तेचा पाया आहे, त्यामुळे कार्यकर्त्यांनी या संस्थांमधल्या निवडणुकांना महत्त्व देत त्या जिंकण्यासाठी सज्ज व्हा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

****

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या वतीनं “मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना” सुरु करण्यात आली आहे. प्रशिक्षणार्थींना आता सहा महिन्यांऐवजी ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येणार असून, प्रशिक्षणार्थींचं विद्यावेतन त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट हस्तांतरीत होईल. इच्छुक उमेदवारांनी महास्वयम डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावरून अधिक माहिती घेण्याचं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०२५–२६ जाहीर करण्यात आला आहे. या कार्यक्रमात ६० फेलोंची निवड करण्यात येणार असून, राज्य शासनाच्या संकेतस्थळावर याच्या निवड प्रक्रियेची संपूर्ण माहिती देण्यात आली आहे.

****

वक्फ सुधारणा विधेयकाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली आहे. त्यामुळे या विधेयकाचं कायद्यात रुपांतर झालं आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात याच आठवड्यात हे विधेयक पारित झालं. राष्ट्रपतींनी मुसलमान वक्फ निरसन विधेयकाला देखील मंजुरी दिली.

****

लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी डोक्यात गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केला. काल रात्री ही घटना घडली. मनोहरे यांनी आपल्या राहत्या शासकीय निवासस्थानी स्वतःवर गोळी झाडली. लातूर मधल्या सह्याद्री रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

****

श्रीराम नवमी आज साजरी होत आहे. या निमित्त देशभरातल्या राम मंदिरांमध्ये राम जन्मोत्सवासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान राम यांचं जीवन सत्य, धर्म आणि नैतिकतेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देते, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

रामनवमीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर इथं मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांच्या नेतृत्वाखाली शांतता समितीची बैठक काल घेण्यात आली. या निमित्ताने पोलिसांकडून रुटमार्च, पेट्रोलिंग करण्यात आलं असून, राज्य राखीव पोलिस तुकडी, दंगा काबू पथक, गणवेशातील आणि साध्या गणवेशातील पोलिस हे विशेष गस्त घालणार आहेत. समाज माध्यमांवरच्या मजकुरावर देखील पोलिसांनी नजर असेल. नागरिकांनीही समाजमाध्यमावर संदेशांची हाताळणी करतांना काळजी घ्यावी, कोणतीही अफवा पसरवू नये तसच अफवांवर विश्वास देखील ठेवू नये, असं आवाहन पोलिस आयुक्तांनी केलं आहे.

दरम्यान, शहरातल्या संस्थान गणपती इथून दुपारी चार वाजता शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

बीड इथं आज सकाळी दुचाकी फेरीचं आयोजन करण्यात आलं आहे. कंकालेश्वर मंदिर परिसरातून दुपारी चार वाजेच्या सुमारास शोभायात्रा काढण्यात येणार असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

जालना जिल्ह्यातही जांबसमर्थ इथं समर्थ रामदास स्वामींच्या राम मंदिरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

शिर्डीमध्ये साईबाबा समाधी मंदिरात कालपासून रामनवमी उत्सवाला प्रारंभ झाला. यानिमित्त मंदिरात फुलांची सजावट करण्यात आली असून मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

****

राज्यात प्रधानमंत्री सूर्य घर योजना आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची अंमलबजावणी आणि वापर वाढवण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावा, असं आवाहन ऊर्जा राज्यमंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी केलं आहे. परभणी इथं काल राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेच्या वतीने साकोरे यांचा ऊर्जा राज्यमंत्री म्हणून निवड झाल्याच्या निमित्ताने सत्कार करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. राज्य शासन स्वच्छ आणि हरित उर्जा निर्मितीवर भर देत असल्यानं सर्वांची जबाबदारी वाढली असल्याचं, त्यांनी सांगितलं.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या नळदुर्गच्या अप्पर तहसील कार्यालयाच्या काही तांत्रिक बाबींची पूर्तता करण्याची प्रक्रिया सुरु असून, कार्यालयात प्रत्यक्ष कामकाज सुरु झाल्यास या भागातल्या नागरिकांना नक्कीच मोठा फायदा होईल, असा आशावाद तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे. ते काल तुळजापूर इथं बोलत होते.

****

गृहराज्यमंत्री योगेश कदम हे परवा बीड दौऱ्यावर आले असता त्यांचा मोबाईल गहाळ झाला. कदम यांनी मस्साजोग इथं संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली, या दरम्यान मोबाईल गहाळ झाल्याचं निदर्शनास आलं. याप्रकरणी केज पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

****

नांदेड जिल्ह्यात हदगाव तालुक्यात शिरड इथल्या पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत काल योग शिबिर घेण्यात आलं. विद्यार्थ्यांनी महापुरुषांचं चरित्र वाचून त्यातून प्रेरणा घ्यावी, कष्ट आणि सातत्यपूर्ण अभ्यासामुळे यश सहज मिळवता येतं, असं मार्गदर्शन साहित्यिक डॉ. राम वाघमारे यांनी यावेळी केलं. या शिबिराला विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि पालकांचा मोठा सहभाग लाभला.

****

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त काल परभणी महानगरपालिकेच्या वतीने संविधान प्रश्न मंजुषा घेण्यात आली. या स्पर्धेत ३४ शाळांमधल्या १०२ विद्यार्थांनी सहभाग नोंदवला. संविधान अभ्यासक डॉ. भीमराव

खाडे यांनी यावेळी मार्गदर्शन करतांना, प्रत्येक भारतीयाने संविधानाला अभिप्रेत कर्तव्यांची जाण ठेवण्याचं आवाहन केलं.

****

जागतिक स्वमग्नता दिनानिमित्त काल लातूर इथं विशेष कार्यशाळा घेण्यात आली. केंद्र सरकारच्या दिव्यांगजन सशक्तीकरण विभागाचे आयुक्त एस. गोविंदराज यावेळी उपस्थित होते. स्वमग्नता असलेल्या मुलांचा बौद्धिक आणि मानसिक विकास साधण्यासाठी पालकांसह समाजाच्या विशेष प्रयत्नांची गरज असल्याचं मत गोविंदराज यांनी व्यक्त केलं.

****

बीड जिल्ह्यात मागच्या दोन दिवसात झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानाचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी केली. त्यांनी काल याबाबत एक निवेदन शासनास सादर केलं.

****

**हवामान**

येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाडा आणि विदर्भात या काळात हवामान कोरडं राहील.

राज्यात काल सर्वात जास्त ३९ अंश सेल्सिअस तापमान ब्रह्मपुरी इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात धाराशिव तसंच छत्रपती संभाजीनगर इथं ३६ पूर्णांक आठ, परभणी इथं ३५ पूर्णांक सहा तर बीड इथं ३७ पूर्णांक चार अंश तापमानाची नोंद झाली.

****